Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

Research Article

बळीराजाचे कैवारी - छ.शिवाजी महाराज

संजय गायकवाड
विभाग प्रमुख (इतिहास) , मारुतीराव हरीराव महाडिक कला व वाणिज्य महाविद्यालय मोडनिंब.

प्रस्तावना :-

सतराव्या शतकाच्या प्रारंभी महाराष्ट्रात राजकीय दृष्टया अंत्यत अस्थिर वातावरण निर्माण झाले होते. मोगलांच्या दक्षिणेतील आक्रमणामुळे शाही सत्तांना जबरदस्त धक्का बसला. शहाजीनी मोगलांचा प्रखरपणे प्रतिकार करुन निजामशाही टिकविण्याचा प्रयत्न केला. पंरतू शहाजींना यश मिळाले नाही. महाराष्ट्रामध्ये पुणे जहागिरीचा अल्पशा भाग शहाजीकडे राहिला. विजापूरची नोकरी पत्करल्यानंतर आदिलशहाने पुणे जहांगिरीला मंजूरी दिली. शहाजीनी पुणे जहांगिरीचा लोभ न धरता कर्नाटकात आपला जमा बसविण्यास सुरुवात केली. त्याच्या प्रयत्नामुळे पुढील काळात बलाढय मोगली सत्तेशी झुंज देण्यासाठी मराठे निर्भयपणे उभे राहू शकले आणि महाराष्ट्राच्या गिरीदुर्गाचा आणि कडेकपाऱ्याचा उपयोग करुन प्रदीर्घ काळापर्यंत बलाढय सत्तेशी लढा देता येतो या अनुभवामुळेच निजामशाही नष्ट झाल्यावर १० वर्षानी आदिलशाही सत्तेला ठोकरुन स्वराजाची मुर्हूतमेढ रोवण्याची अभूतपूर्व घटना महाराष्ट्रात घडून आली. मराठी मनाला जागे करुन स्वातंत्र्याचा महामंत्र यशस्वी करण्याचा पहिला प्रयत्न शिवाजी महाराजांनी केला. पारतंत्रात होरपळून गेलेली अन्याय व जुलूमाने गांजलेली व दुखावलेली स्वाभीमानी बाणाची मराठी मने 'स्वराज्य' या शब्दाने पेटून निघाली महाराष्ट्रधर्माचे पुनरुज्जीवन होवून शिवाजी महाराजांच्या नेतृत्वाखाली केवळ वीस वर्षात मंदिरात स्वातंत्र्य मंदिराची उभारणी झाली. (१ पृ.क्र.२६०) नैसर्गिक परिसरात हवामान, भौतिक साधनसंपत्ती आणि लोकांनी उपयोगात आणलेली उत्पादनासाठी लागणारी अवजारे यासारख्या घटकांचीच माणसांच्या सामूहिक जीवनावर छाप असते. नंतर जीवनातून घेतलेल्या अनुभवावर आधारित तत्वे आणि श्रध्दा घेतात आणि शेवटी अमूर्ततेच्या प्रक्रियेतून आपल्याला आदर्श संकल्पना लागतात. (२ पृ.क्र.१२)

कृषी आधारित समाजव्यवस्था हे भारताचे आगळेवेगळे असे वैशिष्टय कायमच राहिले आहे. कुठल्याही प्रदेशाचा इतिहास हा येथील भूगोल व निर्सगावर अपरिहार्यपणे अवलंबून असतो. (३पृ.क्र.७६) भारताची प्राकृतिक व शक्ती यांच्या प्रभावाखाली भारताचे आर्थिक जीवन शेतीच्या अनुषंगाने विकसित झाले आहे. कृषिजीवन आणि सर्वसाधारण भौगोलिक परिस्थिती यांनी सुध्दा या देशांची राजकिय रचना व विकास यांना आकार देण्यात महत्वाची भूमिका बजावली आहे. (२ पृ.क्र.१७)

- **१७ व्या शतकातील कृषिव्यवस्था :**

१७ व्या शतकात महाराष्ट्राचे आर्थिक जीवन शेती व्यवसायाशी निगडीत होते. या काळातील आर्थिक व सामाजिक व्यवहाराचा केंद्रबिदू म्हणजे खेडे होते. शेती व्यवसाय हा जीवनाचा प्रमुख मार्ग असल्याने बहुतांशी लोक शेतीवरच अवलंबून होते. त्यामुळेच खेडयामध्ये शेती व्यवसायाला आगळे स्थान होते. वतनदार प्रत्यक्ष शेती करीत नसत. प्रत्यक्ष शेतावर राबणारा रयत खरा शिवकालीन शेतीचा आधार होता. शेती व्यवसाय हाच समाजातील प्रमुख व महत्वाचा मानला जात होता. शेतीचे उत्पन्न हेच खरे राज्याचे उत्पन्न होते. (४ पृ.क्र.२८८-२८९)

शिवकाळात जमिनीचे दोन भाग केले जात. वसाहतीच्या जमिनीला पांढरी तर कसायच्या जमिनीला काळी असे संबोधले जात असे. लागवडी खालील जमीन पुन्हा प्रत्यक्ष लागवडीखाली आणि पडीक अशी विभागणी केली जात असे. तत्वतः राजा हा सर्व जमिनीचा मालक असे प्रत्यक्षात मात्र तसे नव्हते. आपल्या ताब्यातील जमीनी तो कसण्यासाठी मालकी हक्काने गावकऱ्यांना देत असे. जमीन करणाऱ्यांचा हक्क हा केवळ जमीन कसण्यासाठी असे जमिनीवरील मालकी हक्क अंतिमतः सरकारचा होता. जमीन कसणाऱ्यांने महसूल बुडवल्यास सरकार त्यांच्याकडून जमीन काढून घेवून दुसऱ्यास देवू शकत असे. या प्रथेचे स्पष्ट पुरावे कोकणातील जमिनीच्या संदर्भात मिळतात.(३ पृ.क्र.७६) मध्ययुगीन भारतात जमिनीवरील लोकांचा खाजगी हक्क सर्वसाधारणपणे मान्य करण्यात आलेला होता. जमिनी या खाजगी मालकीच्या होत्या. शिवाय राजाला स्वतःच्या जमिनी असत. त्याशिवाय पडीक किंवा लागवडीखाली आलेल्या जमीन राजाच्या मालकीच्या असत. (५ पृ. क्र.४२)

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

- **शिवकालीन कृषि व्यवसायावरील कर :**

१७ व्या शतकात व त्यानंतरच्याही कालखंडात राज्याचे उत्पन्न विविध कराची आकारणी करुन मिळविले जात असे. 'महाराष्ट्रेतिहासाची साधने ' या ग्रंथात डॉ.वा.सी.बेंद्रे यांनी अनेक मेस्तकांचा उल्लेख केला आहे. मेस्तक म्हणजे आर्थिक व्यवहाराचे हिशोब कसे ठेवावेत. यांची मार्गदर्शन पुस्तिका

१. **जकात** : मालाची वाहतूक व उत्पादनावरील कर
२. **जिराईत** : जिराईत जमिनीवरील शेतसारा
३. **बागाईत** : बागायत जमिनीपासून मिळणारे उत्पन्न
४. **बारनगजग** : आंब्याच्या बागेपासून मिळणारे उत्पन्न
५. **बार गुजानन** : वेली पासून होणारे उत्पन्न
६. **बादस्ती** : झाडापासून मिळणारे उत्पन्न
७. **कटुबाग** : पडजमिनीपासून येणारे उत्पन्न

उपरोक्त उल्लेखित पध्दतीनेच कर आकारणी होत असे नाही. (३ पृ.क्र.७९-८०)

- **शिवकालीन इतर कर :**

शिवकाळात प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कर प्रचलित होते. प्रत्यक्ष करामध्ये इनामपट्टी,मिरासपट्टी, देशमुखपट्टी अशा प्रकारच्या करांचा समावेश होता. शिवाजी महाराजांच्या राज्यभिषेकाप्रसंगी सिंहासनपट्टी / तख्तपट्टी सर्व वतनदारावर बसविण्यात आली होती. (६ पृ.क्र.१०९) व्यावसायिकांनाही कर दयावा लागत होता. यास सराफ, धनगर, वीणकर, चांभार, तेली इ. व्यावसायिकांना कर दयावा लागत होता. वीणकरांच्या कराला भागरका, चांभाराच्या कराला पायपोशी, तेलाच्या कराला तेलपट्टी असे म्हणत. कर एकजिनसी /वस्तुच्या स्वरुपात देण्याची पध्दत होती. क्वचित प्रसंगी प्रत्यक्ष पैशाच्या स्वरुपात कर वसुल केल्याचे दाखलेही मिळतात. खेडयामध्ये बलुतेदारांकडून 'फारुक' कर दयावा लागे. अप्रत्यक्ष करामध्ये अनेक प्रकारचे कर समाविष्ट होत असत. चुंगी, वांगी, फसकी, पळकी, सेवाधारा, उरीदलाली इ. प्रकारचे अप्रत्यक्ष कर शिवकाळात रुढ होते. धान्य, फळफळावळ, कापडचोपड, गुरेढोरे, यांच्या विक्रीवर कर लादलेले होते. गुलामांच्या विक्रीवर, मीठावरही कर वसूल केला जात असे. स्वराजाची आर्थिक गरज भागविण्यासाठी विविध प्रकारचे कर बसविणे अत्यावश्यकच होते. पंरतू असे कर बसविताना कर क्षमता कमी असलेल्या लोकांवर अन्याय होणार नाही याची जबाबदारी घेतली जाई. (१ पृ.क्र.२७७)

- **शिवकालीन महसूल व्यवस्था :**

महसूल हे शिवाजी महाराजांचे स्वराजाचे उत्पन्नाचे साधन होते. महसूल निश्चितीसाठी जमिनीची मोजणी करणे आवश्यक होते. शिवकाळात जमिनीची मोजणी १६३६ ला दादोजी कोंडदेव, १६८८ ला मोरोपंत पिंगळे, १६७८ ला आण्णाजी दत्तो यांनी केली. जमीन मोजणीसाठी पाच हात लांब व पाच मुठी लांबीची काठी वापरण्यात आली. त्याला "शिवकाठी" म्हणून ओळखले जात असे. जमिनीची प्रतवारी ठरवून त्या जमिनीतील उत्पन्न पिकांचा अंदाज घेवून महसूल कर ठरविला जात होता. (७ पृ.क्र१३६)

शिवकाळाची लांबी सर्वच ठिकाणी सारखीच होती. असे दिसत नाही. काही ठिकाणी ८२ तसूच्या ऐवजी ८४ तसूची काठी आहे. जमीन मोजण्याचे काम महार जातीकडे असे त्याच्या हाती असणाऱ्या काठीला चलतीकाठी असे म्हणत. महाराजांनी रयतेवर त्यांच्या शेतजमिनीवरील उत्पनाचा २/३ काम महसूल दर म्हणून निश्चित केला. आणि याच काळात औरंगजेबजाने १/२ दराने म्हणजेच महाराजांनी आकारलेल्या दराच्या दुप्पटीने महसूल कर निश्चित केला होता. (८ पृ.क्र.१६१)

शेतीमहसूल गोळा करण्यासाठी पाटील, कुलकर्णी इ. मुलकी अधिकारी होते. मात्र आदिलशाही किंवा मोगलाई प्रमाणे वसुलीची अंधाधुंदी महाराजांनी नाहीशी केली होती. 'रयतेच्या वाटा रयतेस पावे आणि राजभाग आपणास येई ते करणे ' अशा आशयाच्या आज्ञा महाराजांनी सुभेदाराला दिलेल्या होत्या. (९ पृ.क्र.२६९)

सभासद व बखरीतील उल्लेखावर शिवकाळात स्वराज्याची मोजणी झालेली आढळते. पिकाला आकार बिघावर ठरविण्यात येई. पिकाचे पाच भाग करुन तीन भाग रयतेला व दोन भाग सरकारला अशा प्रकारची वाटणी केली जात असे. शिवाजी महाराजांनी महसूलीचे अधिकार मुलकी अधिकाऱ्यांस दिले होते. मात्र वसुलीची अंधाधुंदी महाराजांनी नाहीशी केली होती. वसुली धान्याच्या रुपात केली जात असे. सरदेशमुखी हा शिवकाळात उत्पन्नाचा मोठा घटक मानला जाई. सरदेशमुखी म्हणजे सुभ्यातील एकूण महसूलीचा १० वा हिस्सा. पराभूत / दुर्बल सत्ताधिशांकडून चौथा वसूल करण्याचाही शिवकाळात प्रघात होता. (१ पृ.क्र.२७६)

- **शिवाजी महाराजांचा शेतकरी व शेतीविषयक दृष्टीकोन :**

शिवाजी महाराजांच्या काळात महाराष्ट्राचे आर्थिक जीवन शेतीव्यवसायाशी संपूर्णपणे निगडीत झाले होते. उत्तम शेती, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरी हे सुभाषित प्रसिध्दीस आहे. शिवकालीन महाराष्ट्रात खेडयाचा समावेश होता. खेडी ही स्वयंपूर्ण होती. खेडयातील सर्व व्यवहार खेडयामध्ये चालत असत. शेती येथील अर्थव्यवस्थेचे मुख्य स्त्रोत होते. आणि उपजिविकेचे मुख्य साधन होते.

शिवकाळात शेतकऱ्यांस रयत कुणबी, रया, कुळवाडी इ. नावाने ओळखले जात होते.

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

१. **धार्मिक इनामी :** शिवाजी महाराजांच्या काळात राज्यसत्ता धार्मिक संस्था वा मठांना उत्पन्न देणाऱ्या जमिनी इनाम देत असे. शिवाजी महाराजांनी चिंचवड, चाफळ, सासवड, पारगाव येथील संस्थाना उत्पन्न देण्याऱ्या जमिनी दान केल्याचा उल्लेख कागदपत्रामधून येतात. धार्मिक इनामाखेरीज इनामाचे दोन प्रकार रुढ होते.

अ) सनदी दिवाण निसबत :

हे इनाम राज्यसत्तेने फर्माने काढून निर्माण केलेले असे. अशा इनामाला बराच वेळा नैमित्तिक करांमधून सूट मिळत असे. इनामधारकाला शेतकऱ्याचा काही काम राजसत्तेला देणे बंधनकारक असल्यास उत्पन्नाचा तेवढा भाग देणे बंधनकारक आहे. त्यावरुन संबंधित इनामाला इनाम निमाई, इनाम-तिजाई, इनाम-चौथाई अशा नावाने संबोधले जात असते.

ब) चोळीखण इनाम :

युध्दामध्ये एखादा सैनिक धारातीर्थी पडल्यास त्याच्यामागे त्याच्या विधवा पत्नीस इनामी जमीन देण्यात येत असे. तसेच विशेष कामगिरी बजावलेल्या सैनिकांना कवचित इनामी जमिनी दिली जात असे. (३ पृ.क्र.७७)

२. शेतकऱ्यांविषयी दृष्टिकोन :

शेतीवर महाराजांचे अनन्यसाधारण भक्ती होती. रयत ही 'लेकरासमान' ही भावना होती. महाराज हे दूरदृष्टी होते ते एका पत्रात लिहतात " रात्री दिवे मालवून झोपा कारण दिव्यातील वात उंदीर पळवून नेतील आणि त्यामुळे गवताची गंज जळून जाईल. गाई वासरे उपाशी असून भावी पिढीला दूध मिळणार नाही. रयत सुखी तर राजा खुशी हे शिवाजी महाराजांच्या कल्याणासाठी नव्हे तर बहुसंख्य रयतेच्या कल्याणासाठी आहे ही भावना त्यांच्या अनेक आशा पत्रातून व्यक्त झालेली आहे. म्हणूनच इतिहासकार त्यांना 'रयतेचा राजा' असे म्हणून त्यांचे वर्णन करत. (१० पृ.क्र. ३८६) शिवपूर्व काळात राजकिय अस्थिरतेमुळे कृषिजीवन उध्दवस्त झाले होते. अशा परिस्थितीत सोन्याच्या नांगराने नांगरण्यासारख्या कृतीला प्रतिकात्मक अर्थ फार मोठा होता. राजसत्तेने शेतकऱ्यांला आश्रय दिले. असा याचा अर्थ होता. मावळच्या प्रदेशात विस्कटलेल्या शेती व्यवसायाची घडी बसवण्याचा प्रयत्न शिवाजी महाराजांनी केला. (३ पृ.क्र.७७,७८)

यादवकाळापासून महाराष्ट्रात वतनदाराची परंपरा निर्माण झाली होती. इस्लामी राज्यकर्त्यांनी वतनदारी पध्दतीची जोपासना केली. बहाजणीकाळात वतनदारांनी राज्यकर्त्यांना खुश करण्यासाठी आणि महसूल गोळा करण्यासाठी रयतेवर निष्ठूरपणे अत्याचार केले. शिवाजी महाराजांना गुंड प्रवृत्तीच्या वतनदारांचा अत्यंत तिटकारा होता. रयतेवरील अत्याचार दूरकरण्यासाठी वतनदारी पध्दत बंद करण्याचा त्यांचा प्रखर विचार होता. (११ पृ.क्र.२७,२८)

शिवाजी महाराजांनी आपल्या स्वराजाला थोडेसे स्थैर्य प्राप्त झाल्यावर त्यांनी आपल्या देशातील गरीब शेतकऱ्यांस कसे सुखी करता येईल. त्याचा प्रामुख्याने विचार केला. कारण 'प्रजेचे हित हेच राजांचे आणि राज्याचे हित' या पारंपारिक विचारसरणीची त्यांना पूर्णपणे जाणीव होती. म्हणूनच त्यांनी रयतेला जुलमी जमिनदारांकडून मुक्त केले. सर्वप्रथम त्यांनी पाटील, कुलकर्णी, देशमुख इ. मिरासदारांना आपल्या अंकित करुन घेतले. आणि त्यांच्या वर्चस्वाखाली असलेल्या रयतेची मुक्तता करुन राजा आणि प्रजा यांचे प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित केले. (१२ पृ.क्र.४२,४३)

३. शिवाजी महाराजांनी अधिकाऱ्यांना केलेल्या सूचना :

शिवाजी महाराजांनी रयतेला कसलीही तोशीरा पडू नये त्यांचे नुकसान होऊ नये म्हणून जमिनीच्या मोजणीचे काम हाती घेतले. ज्याचा जास्तीत जास्त फायदा लोकांना मिळावा असा दृष्टिकोन होता. जमीन मोजणीचे हे महत्वाचे कार्य गावाला मेहतर व बलुतेदार महार यांच्याकडे सोपविले जाई. मोजणी झाल्यानंतर चकबंदी अथवा विघावणा म्हणजे प्रत्येकाच्या मालकीच्या जमिनीच्या चतु:सिमा ठरवल्या जात असे. लावणी, संचणी आणि उगवणी या शेतीच्या प्रक्रियावर गावच्या पाटलांचे जातीने लक्ष असे. वाजर जमीन लागवडीस आणणे, संकटकाळी रयतेचे रक्षण करणे अनेक गावाचा मिळून एक परगला बनत असे. या परगण्याचे प्रमुख म्हणजे देशमुख आणि देशपांडे होते. त्यांना गावातील पाटील व कुलकर्णी यांच्यावर देखरेख ठेवावी लागे. विशेषत: परगण्यावर जर मोगल अथवा अन्य गनीम चालून आले तर रयतेला शेजारच्या गडावर अथवा घाटाखाली सुरक्षिततेच्या जागी नेऊन त्यांचे संरक्षण करावे लागे. या कामात कसूर झ ाल्यास परगण्याच्या वतनदाराला जबाबदार धरले जाई. एका राजपत्रात शिवाजी महाराजांनी रोहिडखोऱ्याच्या सर्जेराव जेधे देशमुखाला बजावून सांगितले होते. काहीवेळा आपलेच सैनिक तळ जेथे पडला असेल त्या परिसरातील शेतकऱ्यांला निष्कारण त्रास देत असे. ही बाब महाराजांच्या लक्षात आली. चिपळूनजवळ दलवर्णे गावी महाराजांच्या सैन्याची छावणी पडली असताना लष्करी अधिकाऱ्यांनी कसे वागावे या संबंधीचे पत्र १३ मे १६७१ चे पहावयाच मिळते. या वरुन रयतेची काळजी महाराजांना किती होती. याचे दर्शन आपणांस घडविते. सरकारी अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांशी कसे वागावे यासंबंधी राजांने जे आज्ञापत्र काढले होते. यावरुन शेती विकासाच्या कार्यासाठी ते किती दक्ष होते. यांची कल्पना येते. कोकणातील प्रभावाखाली मामलांच्या सुभेदाराला उद्देशून १६७६ साली महाराजांनी पत्र लिहले होते. या पत्रात शेतसारा योग्य तो वसूल करणे रयतेवर जुलूम करुन अतिरिक्त शेतसारा वसूल करु नये. चोरी न करणे, व इमानेइतबारे योग्य काम करावे. अशा स्वरुपाची माहिती मिळते अधिकाऱ्यांनी कचेरीत अथवा चावडीत केवळ बसून ही कामे करु नये. त्यांनी कष्ट करुन गावच्या गावे फिरावे तेथील मुल्यांना जमा करुन त्यांची वैयक्तिक माहिती गोळा करावी. असा आदेश महाराजांनी सरकारी आणि ग्रामाधिकाऱ्यांना दिला होता. ज्या शेतकऱ्यांत शेती करण्याची कुवत आहे पण काही अडचणीमुळे तो ती करु शकत नाही तर अधिकाऱ्यांने त्यांच्या मार्गातील अडचणी दूर करुन त्याला शेती करण्यास उद्युत्क करावे असे महाराजांनी आपल्या अधिकाऱ्यांना आदेश दिले होते. शेतकऱ्यांला त्यांच्या व्यवसायासाठी जे काही कर्ज दिले. असे त्यांची वसूली दामदुप्पटीने आणि घाईगर्दीने आणि त्यांची औजारे जप्त करु

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

नये. कर्जाची वसूली हप्त्याहत्याने आणि शेतकऱ्यांच्या कुवतीप्रमाणे करावी. शेतकऱ्यांना कर्ज देण्यासाठी हवा तितका पैसा सरकारी खजिन्यातून पुरवला जाईल असे आश्वासन महाराजांनी आपल्या अधिकाऱ्यांना दिले होते. (१२ पृ.क्र.४३,४६)

४. शिवाजी महाराजांची महसूल विषयक भूमिका :

शिवकाळात जमिनीत येणाऱ्या पिकानुसार साऱ्याचे प्रमाण ठरविले होते. पिकाचे नगदी खरीप, रब्बी, असे वर्गीकरण केलेले असे. शिवाजी महाराजांना जमिनदारी पध्दत बंद करुन रयतवारी पध्दत सुरु केली. त्यापुढे शेतकरी व शासन यांच्या प्रत्यक्ष संबंध आला. त्यापुढे शेतकऱ्यांनी जमिनदारांकडून होणारी पिळवणूक थांबली असे. दुष्काळ, महापूर, वादळ, रोगराई व शत्रूपक्षाने उभे पीक नष्ट केल्यानंतर जे नुकसान होईल त्यांचा अंदाज घेऊन रयतेला महसूल करात सूट दिली होती. महसूल कर भरण्यास शेतकऱ्यांला तगादा लावला जात नव्हता. महसूल कर धान्याच्या व रोख पैशाच्या स्वरुपात स्विकारला जात होता. कोणत्याही जाचक अटी लावण्यात आल्या नव्हत्या. शिवाजी महाराजांनी महसूल कराविषयी विचारपूर्वक आदर्श पध्दतीचा स्विकार केला होता. (०७ पृ.क्र.१३६,१३७) कुलकर्णी च्या आपल्या हिशोब लेखनिकाच्या साहयाने जमिनीचा ठरलेला सारा वसूल करणे आणि चौगुला या दुय्यम पदावरी गावकरी अधिकाऱ्यांच्या मार्फत तो सारा सरकारी कचेरील भरणा केला जात असे. हा सारा रयतेकडून धान्य रुपाने आणि पैशाच्या रुपाने वसूल केला जात असे. पण काही वेळा धान्य गोळा करण्याचा आपला त्रास चुकविण्यासाठी त्या धान्याची किंमत बाजारभावाने ठरवून रयतेकडून रोकड सारा रुपाने घेत परंतू पैशाची अडचणीमुळे पैशाच्या रुपाने सारा भरणे शेतकऱ्यांना जिकरीचे होत असे. त्यामुळे वस्तुरुपाने माल वसूल करुन तो इतर ठिकाणी विकला तर त्या मालाला अधिक दर येइल व त्याचा आपल्याला फायदा होईल यावरुन महाराजांनी अर्थशास्त्रातील " मागणी आणि पुरवठा" या सिध्दांताचा अवलंब केल्याचे दिसते. (१२ पृ.क्र.४३ व ४५) शिवकाळात गावात कोणाकडे जमीन व मनुष्यबळ आहे पंरतू बैलजोडी नाही त्यांना बैलजोडी, नांगर बी-बीयाणाची मदत केली जात असे. त्याचप्रमाणे पडिक जमीन लागवडीखाली आणण्यासाठी कर्जाची सोय केली जात असे. मात्र कर्ज व शेतसारा वसुल करताना त्याच्या सामर्थ्याने व हप्त्याने ते वसूल करावे अशी सूचना सुरक्षित व समृध्दीने जीवन जगता आले पाहिजे याबाबत शिवाजी महाराज काळजी घेत असत. (१३ पृ.क्र.१८८,१८९)

५. शिवाजी महाराजांनी शेतीस केलेल्या पाणीपुरवठयाच्या सुविधा:

शेतीवर आधारलेल्या शेतीस आर्थिक व्यवस्थेत पाटबंधाऱ्यांचे महत्व अधिक आहे. शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी विविध राजांनी प्रयत्न केल्याचे पुरावे मिळतात. शिवाजी महाराजांनी या धोरणाचा पाठपुरावा केलेला होता. शेतीला योग्य पाणीपुरवठा केल्यास शेतीत सुधारणा होती याची जाणीव त्यांना होती. शिवकाळात शेतीला पाटाच्याद्वारे पाणीपुरवठा करण्याच्या पध्दतीला 'पाटस्थळ ' असे म्हणत आणि शेतीला विहिरीद्वारे पाणीपुरवठा केल्यास 'मोटस्थळ' असे म्हणत. (१२ पृ.क्र.४२-४३)

धरणे व कालवे :

मराठी राज्यकर्त्यांनी दुष्काळासारख्या आपत्तीला तोंड देण्यासाठी कायमस्वरुपी उपाय योजनांची अंमलबजावणी केली. त्यानुसार त्यांनी धरणे बांधणे, कालवे खोदणे, पाटबंधारे बांधणे, तलाव / तळे बांधणे विहिरी खोदण्यास शेतकऱ्यांस उत्तेजन देणे व त्याद्वारे शेतीला पाणीपुरवठा केल्याची अनेक उदाहरणे ऐतिहासिक कागदपत्रातून मिळतात.

कालव्याच्याद्वारे किंवा पाटबंधाऱ्याच्या द्वारे शेतीला पाणीपुरवठा करण्याच्या पध्दती मराठी प्रदेशात होती. कात्रजच्या घाटात डोंगरावरुन पुण्याच्या दक्षिणेला आविला ओढा वाहत होता. शिवकाळात दादोजी कोंडदेवने या नाल्यावर धरण बांधण्याचा उल्लेख पेशवे दप्तरात सापडतो. पर्वती तळयात याचे पाणी आणल्याचा उल्लेख मिळतो. माळशिरस गावाजवळीत ओढांच्या काढापासून दगडाला उंच बांध बांधण्यासंबंधीचा उल्लेख शिवकालीन कागदपत्रात मिळतो (१४-लेख क्र.१) पुण्याजवळील कोंडवा येथे बंधारा बांधण्याचे काम कुशलतेने पूर्ण करणाऱ्या येसाजी कामथे पाटलाला शिवाजी महाराजांनी उत्पन्न देणारी इनामी जमिन दिली होती. आदिलशहाकडून जावळीचा भाग कब्जात आल्यावर शिवाजी महाराजांनी तेथे कृष्णाजी बाबाजी यांना सुभेदार नेमले होते. (३ पृ.क्र.७७)

शिवकाळात ॲबे कॅरे हा फ्रेच प्रवासी पश्चिम किनारपट्ीला येऊन गेला त्याने केलेल्या प्रवास वर्णनात कोकणातील डोंगर कपारीच्या ठिकाणी अनेक गावात लहान लहान नदयांना बांधरे घातल्याचे व त्याचे पाटलाकडून त्याचा शेतीला उपयोग केल्याचे त्यानी नोंद केले आहे. (१० पृ.क्र.२९१)

- **निष्कर्ष :**

१. सतराव्या शतकात शेती हा अर्थकारणाचा पाया होता. त्यामुळे शिवाजी महाराजांनी शेतकऱ्यांना वेगवेगळया मार्गाने मदत केली.
२. शिवाजी महाराजांनी शेतकऱ्यांचे पीक हे मुख्य महसूलची साधन आहे याची जाणीव असल्याने शेती व्यवसाय वाढीसाठी प्रयत्न केले.
३. शिवाजी महाराजांनी महसूल व्यवस्थेत सुधारणा घडवून आणल्या जमिनीची मोजणी, पिकाचे स्वरुप, नैसर्गिक परिस्थिती इत्यादीचा विचार करुनच योग्य तो शेतसारा घेतला जात होता.
४. शिवाजी महाराजांनी धार्मिक इनामे, सनदी दिवाणी निसबत, याबरोबरच चोळीखण इनाम देवून सैनिकाच्या विधवा पत्नीला सामाजिक न्याय दिला जात होता.
५. शिवाजी महाराजांची शेतकऱ्यांविषयीची भूमिका पुत्रासारखी होती.
६. शिवाजी महाराजांनी शेती हाच अर्थकारणाला कणा होता याची जाणीव होती म्हणून सर्व परिस्थितीचा विचार करुन कृषि धोरण निर्धारित केले.

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

७. शिवाजी महाराजांनी कृषि धोरणाचा पुरस्कार करतांना योग्य वेळी बी-बीयाणे, खते याचा पुरवठा सरकारी अंबरातून (धान्यगार, कोठार) करण्याची व्यवस्था केली.
८. शिवाजी महाराजांनी बळी राजाच्या विकासासाठी रचनात्मक धोरण आखून सर्व अधिकाऱ्यांनी शेतकऱ्याबद्दल वर्तन कसे असावे यासाठी विविध आज्ञापत्रे काढली हे आजच्या राज्यकर्त्यानाही मार्गदर्शक ठरणारे आहे.
९. शिवाजी महाराजांनी शेतकऱ्यांच्या संरक्षणासाठी पिकांच्या संरक्षणासाठी प्रशासनाच्या मदतीने प्रयत्न केले.
१०. शिवाजी महाराजांप्रमाणे आताचे नेते, प्रशासन यांच्यात दूरदृष्टी असायला हवी. त्यामुळे अनेक अडचणी टाळण्यास मदत होईल.

संदर्भ ग्रंथ :

१. प्रा.ह.श्री.शेणोलीकर, डॉ.प्र.न.देशपांडे, महाराष्ट्र संस्कृती घडण आणि विकास, मोघे प्रकाशन, कोल्हापूर-१९७२.
२. एस.आविद हुसेन (अनुवाद) प्रकाश देशपांडे केजकर, भारताची राष्ट्रीय संस्कृती, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, १९९२.
३. प्रा. डॉ. शुभांगना अत्रे, प्रा.कल्पना रायरीकर, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे २००८
४. डॉ.अ.रा.कुलकर्णी ग.ह.खरे, मराठयांचा इतिहास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. २००६
५. मूरलॅड डब्ल्यू, एच. अकबर ते औरंगजेब, डायमंड प्रकाशन पुणे-२००६.
६. Dr.Kulkarni A.R. Maharashtra in the age of Shivaji , Daimand Publication, Pune-२००८.
७. ज्ञानदेव रंजनवरे आणि जयश्री रणनवरे, शिवाजी व शिवकाळ अक्षरलेणं प्रकाशन, सोलापूर-२००७
८. महाजन बी.डी.मध्यकालीन भारत, एस.चंद्रा, प्रकाशन नई दिल्ली १९९०.
९. प्रा.द.श्री.शेणीलीकर, डॉ. प्र.रा.देशपांडे, महाराष्ट्राला सामाजिक, सांस्कृतिक इतिहास, के सागर पब्लिकेशन्स पुणे-२००६.
१०. जयसिंगराव भाऊसाहेब पवार, मराठी सत्तेचा उदय, पृथ्वी पब्लिकेशन्स, पुणे-२००८.
११. शं.ना. जोशी (संपादक) छत्रपती श्री शिवाजीराजे यांची बखर (कृष्णाजी अनंत सभासदकृत)
१२. डॉ.अ.रा. कुलकर्णी, महाराष्ट्र समाज आणि संस्कृती, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे २००८.
१३. रा.ज्ञा.गायकवाड व इतर, छत्रपती शिवाजी महाराज व शिवयुग, अजब पुस्तकालय, कोल्हापूर १९७८
१४. राजवाडे वि.का. (संपादक) म.इति. साधने खंड १८ वा.